## फिरोज बंगाली टोळीचा सदस्य मोहसिन ऊर्फ डॅन्चो सय्यद यास गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसासह गुन्हे शाखा युनिट ३ ने केले जेरबंद

---

दि ३१/०७/२०१९ रोजी गुन्हे शाखा,युनिट- ३ मधिल पोलीस शिपाई कैलास साळूंखे व नितिन रावळ यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की,पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार मोहसिन ऊर्फ डॅन्चो सय्यद हा पर्वती ओव्हर ब्रिजवर थांबलेला असुन त्याच्याकडे पिस्टल आहे. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक राजकुमार केंद्रे व त्यांचे अधिनस्त पोलीस कर्मचारी यांनी पर्वती व्होरब्रीज या ठिकाणी जावुन सिताफीने पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार मोहसिन ऊर्फ डॅन्चो सय्यद यास १६/३५ वा. पकडले. मोहसिन हा फिरोज बंगाली या कुविख्यात टोळीचा सक्रिय गुन्हेगार असुन फिरोज बंगाली याचे मत्यु नंतर मोहसिन व त्याचे अन्य साथीदार हे त्याची टोळी चालवित असत. मोहसिन याचे अंगझडती घेता एक गावठी कठठा व दोन जिवंत काडतुसे असा किंमत रु. ४०८०० चा माल मिळुन आलेला आहे. त्याचे विरुध्द दत्तवाडी पोलीस स्टेशन गु.र.नं.३५५/२०१९ आर्म ॲक्ट कलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस अधि.कलम ३७(१)सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन तो दि.०२/०८/२०१९ पर्यंत पोलीस कस्टडी मध्ये आहे. त्याचे विरुध्द दाखल गुन्हाची माहीती पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | गु.र.नं. व कलम |
|---|---|---|
| १ | कोंढवा पो.स्टे पुणे. | १६५/२०१० भा.दं.वि.कलम ३५४,५०९,५०४,३४ |
| २ | कोंढवा पोलीस स्टेशन पुणे | १७२/२०१० भा.दं.वि.कलम ३०४(अ), २७९, मो.वाहन कायदा कलम ११९/१७७ |
| ३ | कोंढवा पो.स्टे पुणे | २८०/२०११ भा.दं.वि.कलम ३०२, १४७,१४८,१४९,३२४,४२७,इत्यादी |
| ४ | कोंढवा पोलीस स्टेशन पुणे | ३०२०/२०१३ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ |

सदरची कामगिरी अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री.अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे पुणे श्री.बच्चन सिंह यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेंन्द्र मोकाशी, पोलीस उप निरीक्षक राजकुमार केंद्रे, पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक किरण अडागळे, सहा.पोलीस फौजदार किशोर शिंदे,दिपक मते, पो.हवा रोहिदास लवांडे, मेहबुब मोकाशी, कैलास साळूंखे, नितिन रावळ यांच्या पथकाने केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
युनिट-३, गुन्हे शाखा,पुणे शहर.